# श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात
# माजी विद्यार्थिनींची सभा

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल येथे शनिवार दि. १ ऑगस्ट २०१५ ला माजी विद्यार्थिनींची सभा घेण्यात आली. उपप्राचार्य डॉ. सुचिता पळनीटकर यांनी माजी विद्यार्थिनींना नॅकची भूमिका, नॅक भेटीत दयावयाचा तपशील, महाविद्यालयीन अनुभव आणि विद्यार्थिनींच्या व्यक्तीमत्व विकासात महाविद्यालयाची महत्वपूर्ण भूमिका इ. विषयांवर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयात नव्याने सुरू झालेल्या नवीन उपक्रमाबद्दल काही 'व्यावसायिक प्रमाणपत्र' अभ्यासक्रमाबद्दलची माहिती प्रा. अमर दामले यांनी दिली.




माजी विद्यार्थिनी संघाच्या सचिव प्रा. अनिता गोविंद यांनी २०१५–१६ या सत्रात घेण्याऱ्या उपक्रमांची माहिती विद्यार्थिनींना दिली. 'वापरून झालेले व उपयोगात नसणाऱ्या पुस्तकांना महाविद्यालयात देणगी स्वरूपात देणे व त्याचा उपयोग वाचनालयासाठी करूण देणे' हा अभिनव उपक्रम राबविण्यासाठी माजी विद्यार्थिनींना आवाहन करण्यात आले.




या सभेला मोठया प्रमाणात माजी विद्यार्थिनींचा सहभाग होता. प्रा. आरती बरगे यांनी आभार मानले, तर कार्यक्रमाचे संचालन आकांक्षा सूर्यवंशी हिने केले.

## २. स्व. कविवर्य मंगेश पाडगावकरांना स्वरांजली




श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल, नागपूर येथे माजी विद्यार्थीनी संघ अणि संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित कविवर्य स्व. मंगेश पाडगावर यांना

काव्य व गीताने भावपूर्ण स्वरांजलीचे आयोजन करण्यात आले.

मध्य नागपूरातील प्रसिध्द श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयात नेहमीच विविध उपक्रम राबविले जातात. तसेच नाविण्यपूर्ण कार्यक्रमही महापिद्यालयाचे वैशिष्टये आहे. याच श्रृंखलेत कविवर्य पाडगावकरांना आदरांजली उर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य स्नेहल पाळधीकर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून कवियत्री व लेखिका मनिषा साधू उपस्थित होत्या आपले मनोगत व्यक्त करतांना त्या म्हणाल्या की, ''पाडगावकरांची कविता आशयाने समृध्द आहे. सहज सोपे शब्द जगण्याचे आत्मबळ वाढविते. त्यांची कविता आशयगर्भ आणि आनंदयात्री आहे.''




याप्रसंगी प्रा. वैशाली उपाध्ये, ह्षीकेश करमकर, प्राची नक्षे, मोनिका देशमुख, स्मिता तिजारे यांनी ताकदिने गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सुत्रचंचालन सौ. स्मिता खनगई यांनी केले. या सर्व माहाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी होत्या हे विशेष. माविद्यालयाच्या प्रा. वैशाली उपाध्ये यांच्या 'भावनांचा तू भुकेला रे मुरारी' या गीताने सुरू झालेला हा शब्द स्वरांचा भावपूर्ण प्रवास जवळपास दीड तास मंत्रमुग्ध करवून गेला. 'या जन्मावर या जगण्यावर' या गीतात ह्षीकेश यांच्या युगलस्वरातील 'डोळे कशासाठी' या गीताने प्रेक्षकांची दाद मिळवली. 'शब्द शब्द जपून ठेव' या मोनिका देशमुख यांच्या स्वरातून पाडगावकरांचे काव्य अपूर्वता प्रगट करित गेले. 'शुक्रतारा मुद वारा', 'सावर रे सावर रे', 'श्रावणात धननिळा बरसला', 'जेव्हा तिची नि माझी चोरून भेट झाली', या गीतांनी उत्तरोत्तर या धुंद काव्य–गीत संध्येची शोभा वाढविली.

'सांगा कसं जगायचं', 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, 'यात काही पाप नाही' या कवितांनी डॉ. समिधा चव्हाण यांनी रसिकांना तृप्त केले. 'तुझे गीत गाण्यासाठी सूर जागू दे' या गीताने स्वरांजलीचा शेवट करण्यात आला.

या स्वरांना वाद्यांची साथसंगत दिली, बासरीवर श्री अरविंद उपाध्ये, तबल्याची साथ दिली श्री अशोक टोकलवार यांनी, सिंथेसायझर श्री महेंद्र ढोले, ऑक्टोपॅडच्या साथीवर होते. श्री सुभाष वानखेडे याप्रसंगी नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री अशोक गांधी, सचिव श्री हरीष राठी व सहकार्यवाह ॲड. राजेन्द्र राठी , माजी विद्यार्थिनी व रसिक प्रेक्षक| ांची उपस्थिती लक्षणीय होती.